मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■

नवे विचार...नवी सुरुवात

दैनिक

# हॅलो प्रभात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १४३ ■ मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# स्वबळाचा निर्णय महायुतीवरच उलटणे शक्य ?

## 'मविआ'तील घटक पक्षांची कावळ्याची नजर !

## जिल्ह्यात सुप्त हालचाली,आता अंदाज घेण्याचे वारे





**सांगली : विशेष प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता उंबरठ्यावर येऊन ठेपल्या आहेत. त्यातच महायुतीतील घटक पक्ष अतिआत्मविश्वासात असल्याने, आणि विधानसभेला मिळालेल्या यशाची धुंदी अद्याप त्यांच्या मेंदूत असल्यामुळे सांगली महापालिका, सांगली जिल्हा परिषद, नगरपरिषदा, पंचायत समितीसाठी महायुतीतील घटक पक्षांनी स्वबळाची घोषणा केली तर, महायुतीलाच जबरदस्त फटका बसेल, महाविकास आघाडीची ताकद कमी दिसत असली तरी त्यांची अंतर्गत व्यूहरचना जोरदारपणे सुरू आहे, माजी मंत्री, आ.जयंतरावांसारखा नेता महाविकास आघाडीकडे आहे, त्यामुळे स्वबळाचा डाव महायुतीतीलच घटक पक्षांवर उलटण्याची शक्यता राजकीय जाणकारांमधून बोलली जात आहे.

७८ सदस्यांच्या सांगली महापालिकेत जरी गेल्या निवडणुकीत भाजपने बहुमत मिळिवले असले तरी, सध्याची परिस्थिती भाजपला पूरक नाही. त्यातच महायुतीतील सर्वच घटक पक्षांनी स्वबळावर निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला तर अजितदादांच्या राष्ट्रवादीमुळे अल्पसंख्यांक मतांमध्ये फूट पडण्याचा आणि त्याचा फायदा भाजपला होण्याचा अंदाज भाजप नेत्यांनी बांधला असला तरी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांमुळे भाजपच्या मतांमध्ये विभाजन होणे अटळ आहे. आणि त्याचा फायदा अस्तित्वासाठी ताकदीने लढणाऱ्या महाविकास आघाडीतील काँग्रेस, शरद पवार पक्षाच्य राष्ट्रवादीला होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

येणाऱ्यांसाठी भाजपने दरवाजे सताड उघडे ठेवल्याने सांगली महापालिकेचे राजकारण करणाऱ्या भाजप नेत्यांची डोकेदुखी चांगलीच वाढली आहे. भाजपमध्ये इच्छुकांची भरमार झाली आहे, मुळ भाजपमधील इच्छुकांपेक्षा अन्य पक्षांतून आलेल्या इच्छुकांची संख्याच अधिक आहे, त्यामुळे कुणाला उमेदवारी नाकारली तर नाराजीचा दणका भाजपच्या अधिकृत उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे, तर स्वबळाची घोषणा केली तर मतविभाजनाचा फटका बसण्याची शक्यता आहे, त्यामुळे जिल्ह्यातील भाजप नेते द्विधा मन:स्थितीत अडकलेले आहेत. तथापि आता भाजपचा कोटा जवळजवळ पूर्ण झाल्याने कुंपणावरील आणि उमेदवारीचे बाशिंग गुडघ्यास बांधून तयार असलेल्या इच्छुकांना अजितदादांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी हेच पर्याय शिल्लक असल्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यास वेग आला आहे.

सांगली महापालिकेत गेल्या महापालिका निवडणुकीत भाजपचे ४१ नगरसेवक निवडून आले होते. आता त्यात काँग्रेसच्या चौदा माजी नगरसेवकांची भर पडून संख्या ५५ वर पोहोचली आहे. आगामी निवडणुकीत मैदानात उतरायचेच या इर्षेने तयारीला लागलेले पदाधिकारी आता दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचा अंदाज घेऊ लागले आहेत.अजितदादा यांच्या राष्ट्रवादीकडे इच्छुकांचा ओढा असला तरी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील यांचीही व्यूहरचना सुरू असून ते आता नाराजांचा शोध घेत आहेत.



सांगली महापालिकेच्या राजकारणाने वेगळेच वळण घेतलेले आहे, इच्छुकांची वाढती संख्या लक्षात घेऊन भाजप या ठिकाणी स्वबळाची घोषणा करण्याची शक्यता आहे, तर महायुतीतील घटक पक्ष असलेल्या अजितदादांच्या राष्ट्रवादीने आतापासूनच महापालिका स्वबळावर लढविण्याची तयारी केली आहे. स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय महायुतीने घेतलाच तर त्याचा दणका महायुतीतील सर्वच घटक पक्षांना बसण्याचा अंदाज जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

## भारतमाता विद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील भारत माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिकुर्डे येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनाअंतर्गत उपजिल्हा रुग्णालय इस्लामपूर यांच्यावतीने शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. महेश बाबर यांनी विद्यार्थ्यांना शरीराची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी विविध कडधान्ये, फळे, डाळी, भाजीपाला असा सर्वसमावेशक आहार घ्यावा असे आवाहन केले. वैद्यकीय टीम मार्फत विद्यार्थ्यांची उंची, वजन, डोळे, कान, त्वचा यांची तपासणी करण्यात आली. तसेच आहार, स्वच्छता आणि लसीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉक्टरांनी लहानसहान आरोग्य समस्या असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य सल्ला व उपचार दिले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. धनश्री पाटील,डॉ. माधुरी पायमल सर्व टीम तात्यासाहेब कोरे महाविद्यालयाच्या डॉ. समृद्धी देसाई, मनस्वी कदम, यश इंगळे शर्वरी जिरंगे यांची टीम, मुख्याध्यापक डी.बी सरगर, पर्यवेक्षक विश्वास पाटील, शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## जत तालुका काँग्रेस कमिटीच्या पदनिवडी उत्साहात

**जत : हॅलो प्रभात**

जत तालुका काँग्रेस कमिटीचा पदनिवड कार्यक्रम व कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास सांगली लोकसभा मतदारसंघाचे खा.विशाल पाटील, आ.डॉ. विश्वजित कदम तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष विक्रमसिंह सावंत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या पदनिवड कार्यक्रमात जत तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव पाटील यांची, तर



जत शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी तरुण व उत्साही कार्यकर्ता निलेश बामणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीमुळे तालुका व शहर काँग्रेस संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या प्रसंगी खा. विशाल पाटील यांनी कार्यकर्त्यांना लोकांच्या प्रश्नांसाठी नेहमी सज्ज राहण्याचे आवाहन केले. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षसंघटना सक्षम करण्यासाठी एकजूट व संघटनशक्ती वाढविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. डॉ. विश्वजित कदम यांनी काँग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, महिला-युवक यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काँग्रेस सदैव सज्ज असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त...

### पूरग्रस्त जनावरांसाठी वैरण वाटप

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कृष्णा आणि पंचगंगा नद्यांच्या महापुराने कुरुंदवाड शहर आणि परिसरात शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे, मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पूरग्रस्त पशुपालकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली असून, शहरात वैरण वाटपाला सुरुवात करण्यात आली आहे.

### शासनाचा गुंठेवारीधारकांना दिलासा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गुंठेवारीत करण्यात आलेली बांधकामे व मोकळे भूखंड नियमित करण्याची आणखी एक संधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी देण्यात आलेली मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता दि. २१ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येतील.

### महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

**सातारा : हॅलो प्रभात**

सातारा शहराच्या प्रवेशद्वारावरच खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. शहरातून कराडकडे जाणाऱ्या रस्त्यावर शिवराज चौकामध्ये रस्त्याची दाणादाण उडाली आहे. या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाहने आदळत असून, अपघातही होत आहेत. विशेषत: एसटी महामंडळाच्या बसेस तसेच इतर वाहने या खड्ड्यांमध्ये आदळत आहेत.

## घोडावत इन्स्टिट्यूटचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

संजय घोडावत इन्स्टिट्यूटचा १३वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते इन्स्टिट्यूटच्या ग्रीन कॅम्पस मध्ये वृक्षारोपण व दीपप्रज्वलनाने झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून न्यूज१८ लोकमतचे सीनियर वरिष्ठ वृत्तनिवेदक विलास बडे, सिंजेंटा इंडिया प्रा.लि. संचालक डॉ. माधवानंद काशीद, कंट्री लीड प्रा.लि चे संचालक श्रीधर लाढाणे, संजय घोडावत विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले, इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विराट गिरी , सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व





विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विलास बडे यांनी आत्मनिर्भरतेचे महत्त्व अधोरेखित करत, विद्यार्थ्यांनी कोणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून ध्येय गाठावे.

कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी दिलेली शिक्षणाची संधी ही समतेची ओळख आहे. कोल्हापूरचे विचार, संस्कृती, आणि प्रेम हे जगाला दिशा देणारे आहे, असे प्रतिपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वत:ची आवड आणि उद्दिष्ट ठरवून त्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात माधवानंद काशीद यांनी 'एआय आणि शिक्षण' या विषयावर शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले. शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा संगम हा भविष्यासाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विनायक भोसले यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत, विविध विभागांनी मिळवलेले शंभर टक्के निकाल, स्टाफची मेहनत व नियोजनबद्ध कार्यक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांनी शिक्षणासोबतच मूल्यशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विराट गिरी यांनी करताना संस्थेच्या १३ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा घेतला. त्यांनी आजी-माजी सर्व स्टाफच्या सहकार्याचे व योगदानाचे कौतुक करत संस्थेने देशासाठी सक्षम अभियंते घडवण्याचे कार्य केले असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रणजीत शिरोडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. एन. एस. सासणे यांनी मानले.

## मविआच्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश



**मुंबई : हॅलो प्रभात**

शहापूर तालुक्यातील उबाठा सेना, शरद पवार गट तसेच काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी सोमवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. शहापूर तालुका उबाठा सेनेच्या आदिवासी आघाडीचे अध्यक्ष व शिरोळचे सरपंच संतोष आरे यांच्या नेतृत्वाखाली 'उबाठा' च्या अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमामध्ये भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, पांडुरंग बरोरा, जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकी, तालुका अध्यक्ष भास्कर जाधव, गणेश राऊत, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये शहापूर पंचायत समितीचे ४ माजी सदस्य, १२ सरपंच, ८ माजी सरपंच तसेत अनेक ग्रामपंचायत सदस्यांचा समावेश आहे.

## जिल्हा परिषद शाळा अवल दर्जाच्या : शिवाजीराव नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

खाजगी शाळा पेक्षा जिल्हा परिषद शाळा आज अवल दर्जाच्या बनल्या असून ग्रामीण, निमशहरी भागातील नागरिकांसाठी जिल्हा परिषद शाळा हा एकमेव पर्याय बनला आहे.असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री राष्ट्रवादी पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक यांनी केले.

नाटोली (ता.शिराळा) येथे कै. आनंदराव पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याची वितरण करण्यात आले त्यावेळी नाईक बोलत होते. अध्यक्षस्थानी पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री.नाईक पुढे



म्हणाले, जिल्हा परिषद शाळा या आपल्या सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी पहिली पायरी बनल्या असून नाटोली गावाची जिल्हा परिषद केंद्र शाळा ही लोकसहभागामुळे अव्वल दर्जाची बनली असल्यामुळे आज आदर्श शाळा म्हणून या शाळेचा नावलौकिक झाला आहे. कार्यकारी संचालक कुलकर्णी म्हणाले, कार्यकर्त्यांच्या बद्दल असणारी निष्ठा,प्रेम व जिव्हाळा हा नाटोली गावातील आनंदराव शास्त्री यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमासाठी उपस्थित दाखवून दिला आहे. यावेळी सरपंच राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील,तानाजी पाटील, यशवंत ग्लुकोज संकलक बबन पाटील,अण्णा पाटील, वारणा मोरणा भाजीपाला संघाचे अध्यक्ष भगवान मस्के,आनंदराव चव्हाण, सुभाष पाटील, पी जी पाटील, शंकर नाकील,दत्ता नाकील,तानाजी निंबाळकर शाळा व्यवस्थापन अध्यक्ष संतोष पाटील, विलास पाटील, रोहित पाटील, दिलीप पवार, शिवाजी सातपुते,मधुकर सांळूखे, आनंदा सांळूखे, तानाजी सातपुते, आबासो पाटील, मानसिंग साळुंखे जयसिंग साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तालुक्यात विविध आकारातील गणरायांच्या मूर्त्या दाखल

**कवठेमहंकाळ : जालिंदर शिंदे**

सध्या गणपती बाप्पाच अगदी काही दिवसांवर येऊन ठेपले आहे.देवाला निरविन निराकार समजले जाते.पण कवठेमहंकाळ तालुक्यात गणेशदेव अर्थात गणपती बाप्पा हे मात्र विविध आकारात दाखल झाले आहेत. गणेश उत्सवासाठी

मनमोहक अश्या गणेश मूर्ती भाविकांच्या भेटीला आल्या आहेत. गणेशोत्सवाची ओढ ही अगदी लहानग्यांपासून ती मोठ्यांपर्यंत सर्वांनाच लागलेली असते. गणपती बाप्पाच्या आगमनाची आतुरताही प्रत्येकाच्या मनामनामध्ये दडलेली असते. गणपती बाप्पांचे मनमोहक सुंदर रूप डोळे भरून पाहताना विलक्षण प्रसन्नता

**गणेश आगमनाची लगबग : मंडळेही लागली कामाला**



जाणवते.गणरायाचे हे सुंदर रूप मूर्तीच्या माध्यमातून भक्तांसमोर मांडण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे.कमळातील गणपती, राजसिंहासनावरील गणपती, हाती, गाय, उंदीर यावर विराजमान झालेला असे अनेक आकारांतील गणेश मूर्त्या बाजारात सध्या उपलब्ध झाल्या आहेत. वर्षभर नवनवीन प्रकारच्या मूर्ती घडवून तिला सुंदर रूप देण्याचे काम जिल्ह्यातील सांगली,मिरजे,पलुससह बऱ्याच भागात केले जाते.मात्र कवठेमहंकाळ त्याला अपवाद ठरत आहे.येथे सध्या कोणीही गणपती बनवत नाहीत.फार तर चिखल मातीचे गणोबा केले जातात.येथ अगदी पेण, पनवेल, सांगली, मिरज येथून मुर्ती आणून खरेदी विक्री केली जाते. यावर्षी नैसर्गिक रंगाने सजवलेल्या मूर्तींना विशेष मागणी असल्याचे बोलले जात आहे.गणेशोत्सवाची चाहूल लागल्याने शहरासह ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्ये देखील विविध आकारातील गणेश मूर्त्या दाखल झाल्या आहेत.सध्या गणरायाच्या आगमनाची आतुरता मात्र सर्वांच्या मनामध्ये दिसून येत आहे.घरा बरोबरच मंडळाच्याही सजावटी गणेश आगमनासाठीची लगबग दिसून येत आहे.

सुरवातीला शासनाने पिओपी वर बंदी घातली व ती अगदी शेवटच्या क्षणालाच बंदी अचानक उठवली त्यामुळे मुर्त्या तयार करण्यास वेळ कमी मिळाल्याने बाजारात खुप कमी मुर्त्या आल्या व आपसूकच दरात वीस ते तीस टक्के वाढ झाली आहे.त्याचा परिणाम व्यवसायावर होत आहे.

**– सुशील कुंभार, सुखकर्ता गणपती स्टॉल**

## संपादकीय

# ‘बेस्ट’ निवडणुकीतून धडा घ्यावा लागेल

उद्धव ठाकरेंची बेस्टमध्ये ताकद आहे आणि ते मागील नऊ वर्ष सत्तेत होते. मात्र, मनसेची येथे काहीच ताकद नाही. त्यांच्या वाट्याला देखील केवळ तीन जागा आल्या होत्या. मात्र, मैदानावरील लढाई ही किती अवघड आहे याचा अंदाज या निवडणुकीवरून ठाकरे बंधुंना आला. भावनिक मुद्यांसह मैदानावरची लढाई पूर्ण ताकदीने लढताना योग्य रणनीती आखली तर यश मिळेल. त्यामुळे या निवडणुकीतून धडा घेतला नाही तर ती ठाकरे ब्रँडसाठी मुंबई महापालिका निवडणुकीत धोक्याची घंटा ठरेल. मराठीच्या मुद्यावर एकत्र आलो म्हणजे यश मिळेल, या समजुतीला पहिला धक्का मुंबईचे अनभिषक्त सम्राट समजणाऱ्या ठाकरे बंधुंना बेस्टच्या निवडणुकीत लागला. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना या निवडणुकीतून धडा घ्यावा लागेल. बेस्टच्या निवडणुकीत ठाकरे बंधुंच्या पॅनलला भोपळादेखील फोडता आला नाही. या निवडणुकीचा मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर मोठा परिणाम होणार आहे. बेस्ट पतपेढीच्या निवडणुक ही ठाकरे बंधुंची पहिलीच युती म्हणून निवडणूक होती, मात्र, २१ जागांपैकी एकाही जागेवर या युतीला विजय मिळवता आला नाही. बेस्टच्या निवडणुकीत आलेल्या अपयशामुळे ठाकरे ब्रँड चालला नाही. बॅलेट पेपरवर निवडणूक होऊनही ठाकरेंचा पराभव झाला, अशी टीका करायला भाजपच्या नेत्यांना संधीच मिळाली आहे. झालेल्या पराभवामुळे महापालिका निवडणुकीत देखील ठाकरे ब्रँड चालणार नाही, असे भाजप नेते स्पष्ट बोलत आहेत. ब्रँडचा बँड वाजवला, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली आहे. त्यामुळे खरंच महापालिका निवडणुकीत बेस्टच्या निवडणुकीचा परिणाम दिसून येईल का? याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. वास्तविक पाहता बेस्टच्या निवडणुकीत १५ हजार मतदार होते. त्यातील बहुसंख्य हे मराठी आहेत. निवडणुकीत प्रत्यक्ष ८३ टक्के मतदान झाले. १२ हजार ६५६ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. महापालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टिने ही संख्या पाहिली तर फार मोठी नाही. त्यामुळे सुतावरून स्वर्ग गाठण्याची घाई नको. मुंबई महापालिकेत शिवसेना आणि भाजप युती तब्बल २५ वर्ष सत्तेत होती. मात्र, या काळातदेखील शशांक राव यांचे वडील शरद राव यांची कामगार संघटना शक्तिशाली होती. कामगार संघटनांच्या निवडणुकीत त्यांना यश मिळत होते. कामगारांमध्ये त्यांचा दबदबा होता. कामगार संघटनेतील मराठी कामगार हे शरद रावांना पाठींबा देत असले तरी महापालिका निवडणुकीत मात्र ते भाजप आणि शिवसेनेच्या युतीलाच मतदान करत असल्याचे दिसून आले आहे. शरद राव आणि शशांक राव यांनादेखील विधानसभा आणि महापालिकेच्या निवडणुकीत यश मिळाले नसल्याचा इतिहास आहे. त्यामुळे ’बेस्ट’निवडणुकीचा परिणाम महापालिकेवर होईल का? याबाबत साशंकता बाळगण्यास वाव आहे. ठाकरे बंधुंनी महापालिका निवडणूक एकत्र लढूनही त्यांचा पराभव झाला, तसा भाजप आमदार प्रसाद लाड, प्रवीण दरेकर आणि नारायण राणे, एकनाथ शिंदेंचा पाठींबा असलेल्या महायुतीच्या समृद्धी पॅनेलचा देखील पराभव झाला. त्यांनादेखील केवळ सातच जागा जिंकता आल्या. त्यामुळे ठाकरे बंधूंसोबत भाजपचादेखील पराभव झाला आहे. बेस्टमधील विजय हा शशांक राव यांच्या रणनीतीचा विजय आहे. शशांक राव भाजपमध्ये आहेत, मात्र महायुतीच्या पॅनेलसोबत न जाता स्वतंत्र निवडणूक लढत त्यांनी विजय मिळिवला आहे. गेल्या नऊ वर्षांपासून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या कामगार सेनेचे वर्चस्व बेस्टच्या पतपेढीमध्ये होते. मात्र, या नऊ वर्षांच्या काळाता कामागरांच्या हिताचे रक्षण त्यांना करता आले नसल्याची टीका शशांक राव यांनी केली होती. प्रचारात त्यांनी तोच मुद्दा लावून धरला होता. मागील ९ वर्षांच्या काळात शशांक राव हे कामगारांच्या हितासाठी आपल्या संघटनेकडून रस्त्यावरील लढाई लढत होते. त्यामुळे मागील नऊ वर्षांच्या काळात उद्धव ठाकरेंच्या बेस्टमधील कामगार संघटनेच्या खालावलेल्या कामागिरीचा फटका ठाकरे बंधुंना बेस्टच्या निवडणुकीत बसला तसेच बेस्टमध्ये जुन्या लोकांना बाजुला करून ते नवे नेतृत्व देऊ शकले नसल्याचे देखील उद्धव ठाकरेंना तोटा झाल्याचे दिसते. तथापि शशांक राव आता बेस्टचे विजयी पॅनेल घेऊन भाजपकडे आल्याने बेस्टमध्ये विरोधकच शिल्लक राहिलेले नाही.

# ‘नोबेल’ पारितोषिक मानकरी

## थोर मानवतावादी समाजसेविका... मदर तेरेसा

मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० ला युरोपमधील मॅसिडोनिया या देशात रोमन कॅथलिक अँल्बेनियन कुटुंबात स्कॉपये यूगोस्लाव्हिया येथे झाला. तेरेसा यांचे वडील निकोला बोयाजू एक साधारण व्यावसायिक म्हणजेच किराणामालाचे दुकानदार होते आणि आई शेतकऱ्याची मुलगी होती. तेरेसा आठ वर्षाच्या असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. यामुळे मदर तेरेसा, त्यांची मोठी बहीण आणि भावाच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्या आईवर आली. वडिलांच्या मृत्यूनंतर व त्यांच्या कुटुंबाला आर्थिक समस्यांमधून दिवस काढावे लागले.

मदर तेरेसा या लहानपणापासून अतिशय सुंदर, अभ्यासू व मेहनती होत्या. अभ्यासासोबत त्यांना गाणे गाण्याच्या देखील छंद होता. त्यांच्या आईने लहानपणापासून त्यांना चांगली शिकवण दिली होती. त्यांच्या आईचे म्हणणे होते की, जे काही मिळेल ते सर्वांनी वाटून खावे, स्वतःसाठी तर सर्वच जगतात पण दुसऱ्यांच्या सेवेसाठी जे आपले आयुष्य पणाला लावतात ते खरे महान असतात.

### शिक्षण आणि बालपण

मदर तेरेसा यांचे बालपण सुखात गेले. स्कॉपथे येथील सरकारी शाळेत शिक्षण घेत असताना त्या सेवाकार्यांत रस घेत असत. अठराव्या वर्षी सिस्टर्स ऑफ लॉरेटो या आयरिश संघात त्यांनी प्रवेश केला. नंतर एक वर्ष डब्लिन आयर्लंड येथे इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. त्यानंतर त्यांनी जोगीण बनून पूर्णतः मिशनरी कार्यास वाहून घेतले. या कार्यानिमित्त त्या भारतात कलकत्ता येथे लॉरेटो मिशनच्या सेंट मेरी हायस्कूलमध्ये १९२९ मध्ये भूगोल विषयाची अध्यापिका म्हणून रूजू झाल्या.

स्पॅनिश योगिनी संत तेरेसाच्या नावाने त्यांचे नामान्तर झाले आणि पुढे मातृवत सेवाधर्मामुळे त्या ‘मदर तेरेसा’ या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांनी १९ वर्षे अध्यापन केले. त्यानंतर त्या प्राचार्य झाल्या. अध्यापन करीत असताना शाळेजवळील मोती झील झोपडपट्टीतील गरिबांच्या दीन जीवनाचे त्यांना अनेकवेळा दर्शन होत असे. त्यामुळे त्यांच्या मनात अपंग, पददलित, शोषित, पीडित, दीनदुबळे इत्यादींची सेवा करावी, हे विचार येत. किंबहुना हीच ईशसेवा होय, असे विचार त्यांच्यात दृढमूल झाले. एकदा दार्जिलिंगला जात असताना ‘तू गरिबांच्या सेवेला लाग’ असा जणू दैवी संदेशच त्यांना मिळाला. तेव्हा शैक्षणिक जबाबदारीतून मुक्त होऊन त्यांनी केवळ निराश्रित व दीनदुबळे यांच्या सेवेस आमरण वाहून घेतले. या कार्यासाठी त्यांनी पोपची परवानगी मिळविली आणि कलकत्ता येथे मिशनरिज ऑफ चॅरिटी ही सेवाभावी संस्था स्थापन केली. पुढे या संस्थेचे रूपांतर संघात झाले. त्यांच्या विचारांशी सहमत असणाऱ्या स्त्री–अनुयायीही कार्यकर्त्या म्हणून त्यांना लाभल्या. सुरूवातीस समाजातील उच्चभ्रू लोकांकडून तेरेसांसह सेवाभावी महिलांची खूप हेटाळणी व अवहेलना झाली. त्यांना लोक ‘सेंट ऑफ द गटर्स’ म्हणू लागले. तथापि या टीकेला न जुमानता त्यांनी सेवाकार्य अखंड चालू ठेवले. विशेषतः मृत्युशय्येवरील व्यक्तीस अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजांबरोबर सहानुभूती, सांत्वन व प्रेम यांची नितांत गरज असते, हे त्यांनी जाणले आणि इतरांनाही दाखवून दिले.

संस्थेच्या जोगिणी गटारात, उकिरड्यात व इतरत्र टाकून दिलेल्या उपेक्षित मुलांचे मातृप्रेमाने संगोपन करू लागल्या. मुलांसाठी त्यांनी स्वतंत्र अनाथ आश्रम काढले. तसेच बेवारशी, निर्वासित, निराश्रित व



२६ ऑगस्ट : मदर तेरेसा जयंती

रोगीपीडित मरणोन्मुख व्यक्तींसाठी १९५२ मध्ये ‘होम्स फॉर द डायिंग डेस्टिट्यूट्स’ (निर्मल हृदय) हे आधार आश्रम स्थापन केले.

१९६४ मध्ये तेरेसा यांनी पश्चिम बंगालमध्ये कुष्ठगृहाची स्थापना केली. या लोकांची सेवा करण्यात त्या स्वतःला कृतार्थ मानू लागल्या. कारण कुष्ठगृहातील लोकांची सेवा म्हणजे येशूचीच सेवा होय, अशी त्यांची धारणा झाली. त्या स्वतःस ख्रिस्ताची विनम्र दासी मानत असत.

तेरेसा यांच्या कार्याचा काळानुसार व्याप वाढत गेला आणि कुष्ठरोग रूग्णालये, अनाथालये, महिला–अपंग–वृद्धांची आश्रमगृहे, फिरते दवाखाने, मरणोन्मुखांसाठी आधारगृहे, शाळा इ. विविध संस्था भारतात व भारतेतर देशांत पसरल्या. तेव्हा कार्यकर्त्यांची उणीव भासू लागली. या संस्थांत १९६२ पर्यंत फक्त सेविकांनाच प्रवेश होता. परंतु तेरेसा यांनी ‘मिशनरी ब्रदर्स ऑफ चॅरिटी’ ही वेगळी संघटना स्थापन करून पुरूष सेवकांना त्यात प्रवेश दिला. या संघात २००० जोगिणी व ४०० ब्रदर्स कार्य करतात. मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या शाखा व उपशाखा जगभर ५२ देशांत प्रसृत झाल्या असून एकूण २२७ ठिकाणी संस्थेची सेवाकेंद्रे आहेत.

भारतात व इतर देशांत संस्थेने चालविलेल्या ९८ शाळा, ४२५ फिरती रूग्णालये, १०२ कुष्ठरोग उपचार केंद्रे, २८ शिशुभवने, ४८ अनाथालये व ६२ आश्रमगृहे आहेत. महाराष्ट्रात पुणे, औरंगाबाद, विलेपार्ले या ठिकाणीही सेवा केंद्रे आहेत.

मुंबई येथे आशादान नावाचे स्वीकार–गृह १९७६ मध्ये सुरू करण्यात आले. त्यात शिशुभवन, निर्मल हृदय व रूग्णांची सेवा या तिन्ही शाखा एकत्र केल्या आहेत. या संस्थांसाठी लागणारा खर्च विविध देणग्यांतून तसेच तेरेसा यांना मिळालेल्या पारितोषिकांच्या रक्कमेतून करण्यात येतो.

१९४६ मध्ये त्यांनी गरीब, बिमार आणि असहायांची सेवा सुरू केली. ७ ऑक्टोंबर १९५० मध्ये त्यांना ‘चैरीटी’साठी ‘मिशनरी’ बनवण्याची परवानगी मिळाली. सुरुवातीला या संस्थेत १२ कर्मचारी नन होते. पण आताच्या काळात ४००० पेक्षा जास्त नन या संस्थेत कार्यरत आहेत. या संस्थेद्वारे अनाथाश्रम, नर्सिंग होम, वृद्धाश्रम यासारख्या सेवा संस्था सुरू करण्यात आल्या.

त्या काळात कोलकत्यात प्लेग व कुष्ठरोगाची साथ आली. या रोग्याची सेवा करण्याची जवाबदारी मदर तेरेसा यांनी घेतली. गरिबांसाठी तर मदर तेरेसा देवदूतच बनल्या होत्या. नंतरच्या काळात त्यांनी आपली संस्था भारताबाहेर पोहोचवण्यासाठी भारत सरकारकडून परवानगी मिळवली. आजच्या काळात १०० पेक्षा जास्त देशात त्यांच्या मिशनरी सुरू आहेत. त्यांच्या निःस्वार्थ भावामुळे लोकांमध्येदेखील त्या खूप प्रिय होत्या.

### अनेक पुरस्कार व सन्मान

भारतात स्थायिक झालेल्या अँल्बेनियन महिला मदर तेरेसा ह्या एक थोर मानवतावादी समाजसेविका होत्या. त्यांच्या सेवाकार्याची जागतिक पातळीवर दखल घेतली गेल्याने १९७९ मध्ये त्या शांततेच्या नोबेल पारितोषिकाच्या मानकरी ठरल्या आहेत. याशिवाय त्यांना ४३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानसन्मान लाभले. मागसाय–साय पारितोषिक १९६२, पोप यांचे शांतता पारितोषिक (१९७१), नेहरू पुरस्कार (१९७२ ), पद्मश्री देशिकोत्तमा, नॉर्वे लोकपारितोषिक (१९७९), भारतरत्न (१९८०) हे महत्त्वाचे व मानाचे आहेत. विविध मान्यवर विद्यापीठांनी त्यांना ‘डॉक्टरेट’ ही सन्मान्य पदवीही दिली आहे. मानवतेच्या श्रेष्ठ सेवेबद्दल तेरेसा यांना इंग्लंडची दुसरी राणी एलिझाबेथ यांनी २४ नोव्हेंबर १९८३ रोजी ‘ऑर्डर ऑफ मेरिट’ हा अत्युच्च ब्रिटिश पुरस्कार दिला. स्फुटलेखांद्वारे ‘ए गिफ्ट फॉर गॉड (१९७५)’ या पुस्तकात मदर तेरेसांचे विचार संकलित करण्यात आले आहेत.

### मदर तेरेसा यांचे अनमोल विचार

मदर तेरेसा यांनी आपल्या जीवनाचे सर्वस्व पणाला लावत असताना आलेल्या अनुभवांतून ‘एकटेपणा सर्वात मोठी गरिबी आहे. प्रेम हे प्रत्येक ऋतूत येणारे फळ आहे आणि प्रत्येक व्यक्ती याला प्राप्त करू शकतो. शांतता ही चेहऱ्यावरील एका हास्याने सुरू होते. लहान सहान गोष्टीमध्ये इमानदार रहा, कारण याच्याने तुमची शक्ती वाढते. शिस्त ही ध्येय आणि उपलब्धते धील पूल आहे,’ असे मानवाला दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे महत्वाचे विचार व्यक्त केले आहेत.

### हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

मदर तेरेसा यांचे वाढत्या वयामुळे प्रकृतिस्वास्थ्य बिघडायला लागले आणि त्यांना किडनीची समस्या निर्माण झाली. ७३ व्या वर्षी त्यांना पहिल्यांदा हृदयविकाराच्या झटका आला. यानंतर ५ सप्टेंबर १९९७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. पण मृत्यूच्या ६ महिन्यांआधीच त्यांनी मिशनरीचे अध्यक्षपद सोडून दिले होते. त्यांच्या पश्चात आज ‘मिशनरी ऑफ चॅरिटी’मध्ये ४००० पेक्षा जास्त सिस्टर आणि ३०० अन्य सहयोगी आहेत. जगातील १२३ पेक्षा जास्त देशांमध्ये त्यांचे सेवा कार्य अव्याहतपणे सुरू आहे.

# सभासदांच्या विश्वासामुळेच संस्थेची प्रगती : सुदर्शन ककडे

**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

आम्माण्णा ककडे चिंचवाड ग्रामीण पतसंस्थेला अहवाल सालात २१ लाख ८० हजार रुपयांचा नफा झाला आहे. सभासदांना १० टक्के लाभांश देण्यात येणार असून सभासदांच्या विश्वासामुळेच संस्थेने प्रगती साधली आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष सुदर्शन ककडे यांनी केले.

चिंचवाड (ता. शिरोळ) येथील आम्माण्णा ककडे चिंचवाड ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचा ३८ वा वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी उत्साहात पार पडला, यावेळी ककडे बोलत होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप



प्रज्वलन करून सभेला सुरुवात झाली. संस्थेचे जनरल मॅनेजर सुनील घाटगे यांनी स्वागत करून विषय पत्रिकेचे वाचन केले.

सुदर्शन ककडे पुढे म्हणाले, संस्थेत २७ कोटी ५२ लाख रुपयांच्या ठेवी असून १८ कोटी २ लाख रुपये कर्जे वाटप करण्यात आले आहेत. अर्जुनवाड, चिंचवाड व उदगाव येथील तिन्ही शाखा स्वमालकीच्या इमारतीत असून सर्व सभासद, कर्जदार, ठेवीदार यांच्यामुळेच संस्थेने यश संपादन केले आहे. पुढील वर्षी यापेक्षा जास्त लाभांश देण्यासाठी प्रयत्नशील आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष आण्णासो चौगुले, संचालक अशोक मादनाईक, प्रकाश चौगुले, श्रेणिक पाटील, श्रेणिक मादनाईक, सुरेश चौगुले, अश्विनी चौगुले यांच्यासह चिंचवाड, अर्जुनवाड व उदगाव येथील सभासद कर्मचारी उपस्थित होते. संचालक रामा बंडगर यांनी आभार मानले.

# गरवारे कन्या महाविद्यालयात ‘स्वातंत्र्यसैनिकांवरील ग्रंथप्रदर्शन’ संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयामध्ये ग्रंथालय विभाग, इतिहास विभाग व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथपिता डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३३ वा जयंतीनिमित्त व ७९ वा स्वातंत्र्यदिनानिमित्त ‘स्वातंत्र्यसैनिकांवरील ग्रंथप्रदर्शन’ आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या पुस्तकांचा समावेश करण्यात आला होता. प्रदर्शनाबरोबरच २० मिनिटांचा लघुपटही दाखविण्यात आला. या



चित्रफितीत स्वातंत्र्यलढ्यातील पुरुष व महिलांच्या संघर्षमय वाटचालीचे, त्यागाचे करण्यात आलेले जिवंत चित्रण विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे व लघुपटाचे उद्घाटन वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षा डॉ.लताताई देशपांडे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भावना मारू (ग्रंथपाल) यांनी केले. प्र.प्राचार्य डॉ. ए. एस. सुगते यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृती व रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्रातील योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. लताताई देशपांडे, उपाध्यक्षा श्रीमती स्मिता केळकर, कार्यवाह श्रीमती यशश्री आपटे, सहकार्यवाह श्रीमती गायत्री कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आभार डॉ. यू. एन. क्षीरसागर यांनी मानले.

# संत सेना महाराज जयंतीनिमित्त कीर्तन सोहळा

**बोरगाव : विक्रम देशमुख**



बोरगाव (ता.वाळवा) येथे नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत सेना महाराज यांची जयंती भजन व कीर्तनाच्या नामस्मरणात साजरी करण्यात आली यावेळी अध्यक्ष राम झेंडे, उपाध्यक्ष धनंजय झेंडे, सदस्य प्रदीप झेंडे, संतोष झेंडे, विशाल झेंडे, सागर झेंडे, मनोज झेंडे, अभिजीत झेंडे, रोहित झेंडे, महेश शिरसागर, जयंत झेंडे, निलेश शिंदे, सचिन शिंदे, शशिकांत झेंडे, संदीप शिंदे, देवदत्त झेंडे याच्यासह नाभिक समाज बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आहिल्यादेवी होळकर यांना समाज बांधवांनी केले अभिवादन

**नातेपुते : हॅलो प्रभात**



नातेपुते येथे दरवर्षी श्रावण महिन्यात समाज बांधवांच्या वतीने तिथीनुसार राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी सायंकाळी भजन करुन पुष्पवृष्टी करून समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करण्यात आले, तसेच आरती व पसायदान म्हणून कार्यक्रमांची सांगता झाली. यावेळी हनुमंतराव धालपे चंद्रकांत ठोंबरे,विनायक उराडे, बळीराम काटकर, गणेश बापू उराडे, तुकाराम ठोंबरे, संजय उराडे, सुभाष उराडे, साहेबराव देशमुख, दिलीप लाळगे, विजय डफफळ, सोपान उराडे, पत्रकार बापूसाहेब बाविस्कर, अमर भिसे, एकनाथ उराडे, दत्तात्रेय लांडगे, जगन्नाथ सोनवळ, भागवत चांगण,नारायण चांगण, दिलीप उराडे, नंदुकुमार ठोंबरे, महेश ठोंबरे, संभाजी लांडगे, अनिल गरगडे, दयानंद लाळगे महिला भजनी मंडळसह समाज बांधव उपस्थित होते.

# अदाणी लॉजिस्टिक्स पार्कची कोचीतील कलमश्शेरी येथे पायाभरणी

**कोची : वृत्तसंस्था**



अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडने कलमश्शेरी, कोची येथे अदाणी लॉजिस्टिक्स पार्कच्या पायाभरणीची घोषणा केली असून याचे उद्घाटन केरळचे माननीय मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या हस्ते झाले. इन्व्हेस्ट इन केरळ उपक्रमांतर्गत विकसित होणारा हा महत्त्वाचा प्रकल्प, केरळला लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक क्षेत्रात अग्रणी बनविण्यासाठी एक मोठे पाऊल आहे. औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स विकासाचे केंद्र म्हणून झपाट्याने उभारी घेत असलेल्या कोचीमध्ये ७० एकरांवर पसरलेले हे पार्क उभारले जात आहे. हे पार्क वाहतूक खर्च कमी करण्यासाठी, ‘जस्ट–इन–टाइम’ पद्धतीने कामकाज सुलभ करण्यासाठी आणि ई–कॉमर्स, एफएमसीजी/एफएमसीडी, औषधनिर्मिती, ऑटोमोबाईल आणि रिटेल यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील निर्यात क्षमता वाढविण्यासाठी मदत करेल.

# एनीटाइम फिटनेसने मुलुंड पश्चिम येथे नवीन जिम केली सुरु

**मुंबई : हॅलो प्रभात**



देशातील सर्वात वेगाने वाढत असलेली २४x७ फिटनेस फ्रँचायझी एनीटाइम फिटनेस इंडियाने मुलुंड पश्चिम येथे आपला नवीन क्लब सुरू केला आहे. मुंबईतील एनीटाइम फिटनेसच्या विस्तारातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. उत्साही आणि आनंदी रहिवासी आणि सक्रिय भावनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या मुलुंडमध्ये जागतिक दर्जाच्या फिटनेस सुविधा उपलब्ध असतील. या नवीन क्लबची जबाबदारी विश्व सागर आणि रितू सागर यांनी घेतली आहे. दोघांचाही असा विश्वास आहे की फिटनेस हा आता फक्त एक छंद राहिलेला नाही तर तो दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. नवीन क्लबमध्ये प्रगत उपकरणे, समर्पित फंक्शनल ट्रेनिंग झोन, तज्ञ वैयक्तिक प्रशिक्षक आणि आकर्षक ग्रुप सेशन्स २४/७ उपलब्ध आहेत.

# आगामी काळात फ्रेशर्ससाठी नोकरीच्या संधी : टीमलीज एडटेक

**मुंबई : हॅलो प्रभात**

TeamLease™ EDTECH Making India Employable

टीमलीज एडटेक च्या ताज्या करिअर आउटलुक रिपोर्टनुसार या वर्षातील दुस–या सहामाहीत ई–कॉमर्स आणि टेक्नॉलॉजी स्टार्टअप्स क्षेत्र भारतामध्ये फ्रेशर भरतीचे नेतृत्व करत असून, जुलै–डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी ८८% भरतीचा प्रभावी हेतू दर्शवित आहे. या अहवालात नवख्या उमेदवारांसाठी महत्त्वाच्या उद्योगांमध्ये भरपूर संधी असल्याचे नमूद केले आहे, जिथे रिटेल (८७%) आणि मॅन्युफॅक्चरिंग (८२%) यांचाही फ्रेशर भरतीसाठी मजबूत हेतू दिसून येतो. शहरांमध्ये बेंगळुरू ८१% भरतीच्या हेतूसह आघाडीवर आहे, त्यानंतर मुंबई (६७%) आणि चेन्नई (५९%) यांचा क्रमांक लागतो. या बदलामागे एआय–संचालित कार्यबल पुनर्रचना, जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि कोर उद्योगांमध्ये अनुभवी प्रतिभा टिकवून ठेवण्यावर दिला गेलेला धोरणात्मक भर हे प्रमुख घटक आहेत.

नवे विचार...नवी सुरुवात

दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३०

■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF–७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# संमिश्र

## नवरत्न मंडळाचा झुलता पूल तालुक्यात आकर्षणाचा केंद्रबिंदू



**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

अर्जुनवाड (ता.शिरोळ) येथील नवरत्न मित्र मंडळाने यंदा ४१ व्या वर्षानिमित्त भव्य १४० फूट लांबीचा व १५ फूट उंची असलेला झुलता पूल व ५० फूट मार्लेश्वर देवस्थानची प्रतिकृती गुहेतून शिवलिंगाचे दर्शन साकारण्यात आला असून तो शिरोळ तालुक्यात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. नवरत्न गणेश मंडळाच्या तरुणांनी एकत्रित परिश्रम घेऊन हा झुलता उभारला असून, मंडळाच्या वतीने स्पर्धात्मक उत्सवांमध्येही या देखाव्याची नोंद होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. गावकरी व गणेशभक्तांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, पारंपरिक गणेशोत्सवात झुलता पुलाच्या देखाव्याने भर घातली आहे. तसेच विविध धार्मिक कार्यक्रम महाप्रसाद तसेच सामाजिक उपक्रमांनी गणेश उत्सव साजरा होणार असल्याचे अध्यक्ष रमेश कोळी यांनी सांगितले.

## वाहतूक कोंडीबाबत आ.महाडिक यांनी केली पाहणी



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापुरात मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच स्थापन झाल्यानंतर वर्दळ वाढली आहे. त्यातच गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवाचे वेध लागल्यामुळे भाविक आणि पर्यटकांचेही प्रमाण वाढले आहे. त्यामुळे वाढत्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी शहरातील चौकांचे रुंदीकरण आणि अतिक्रमण निर्मूलन आवश्यक बनले आहे. त्या अनुषंगाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, शहर अभियंता रमेश मस्कर, जलअभियंता हर्षजीत घाटगे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नंदकुमार मोरे यांच्यासह शहरातील विविध चौकांची पाहणी केली. शहरातील प्रमुख चौकात भेट देऊन समस्यांचा आढावा घेतला. नागरिकांना भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीचा निपटारा करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## स्पीड ब्रेकर व खड्ड्यांची तातडीने दुरुस्तीची मागणी



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी कापड व वस्तूंची बाजारपेठ असलेल्या गांधीनगर परिसरात वाहतुकीचा मोठा दबाव असून, भरधाव वेगामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नुकताच भरधाव मोटारसायकलस्वाराच्या धडकेत एका महिलेला जागीच मृत्यू झाला असून एक जखमी झाला. या पार्श्वभूमीवर करवीर तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तर्फे गांधीनगर मेन रोडवरील वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसविण्याची तसेच हुपरी-कोल्हापूर मेन रोडवरील उचगाव, गडमुडशिंगी आदी परिसरातील मोठमोठे खड्डे तातडीने बुजवावेत अशी मागणीही करण्यात आली.यावेळी करवीर तालुकाप्रमुख राजू यादव, उपजिल्हा समन्वयक विक्रम चौगुले, शरद माळी, दीपक पोपटानी, दिलीप सावंत, दीपक अंकल, योगेश लोहार, बाळासाहेब नलावडे, सचिन नागटिळक, धर्मेंद्र मेघवानी, सुनील पारपाणी, रामराव पाटील, बाबुराव पाटील, वसंत पोवार, नमेश चव्हाण, दत्ता फराकटे, सतीश फराकटे आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## कलमी आंबा व चिकू रोपे वाटप उत्साहात




**शाहूवाडी : हॅलो प्रभात**

वरेवाडी येथे भारत फोर्ज लि. पुणे, सहयोगी सेवा संस्था व शिवार सामाजिक विकास व संशोधन संस्था, जयसिंगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गाव विकास योजनेअंतर्गत वरेवाडी व कुंभारवाडी येथील विद्यामंदिर शाळांमध्ये कलमी आंबा व चिकू रोपे वाटप कार्यक्रम घेण्यात आला.या उपक्रमासाठी मा. खा. राजू शेट्टी यांच्या विशेष प्रयत्नातून रोपे उपलब्ध झाली. कार्यक्रमास लोकनियुक्त सरपंच आनंद भोसले,अमर पाटील,उपसरपंच बाबासाहेब बोरगे,मुख्याध्यापक महादेव कुंभार, बाबासो साळोखे , विलास पाटील, कुंभार सर आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच गावातील शाश्वत विकासाला चालना मिळणार आहे.

# सौ.विजयमाला कदम प्रशालेचे कृतियुक्त शिक्षण

### इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवून दिला पर्यावरण जागृतीचा संदेश



**विटा : हॅलो प्रभात**

लगतच्या काळात येणाऱ्या गणेशोत्सवाची सर्वजण आतुरतेने वाट पाहू लागले आहेत. काही ठिकाणी तर गणेशोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. आपल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाची आतुरता सर्वांनाच लागली आहे. जिकडेतिकडे गणरायाच्या मूर्ती बनवण्याचे काम सुरू आहे.विविध रंगानी गणरायाच्या मूर्ती सुशोभित करण्याचे काम कारागीर करत असल्याचे चित्र दिसत आहे.

या गणेशोत्सवासाठी भारतमाता ज्ञानपीठ संचलित सौ.विजयमाला पतंगराव कदम प्राथमिक ,माध्यमिक,व उच्च माध्यमिक विद्यालय विटा येथे गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी 'इको फ्रेंडली' गणेशमूर्ती बनवली.पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टिकोनातून इकोफ्रेंडली गणेशमूर्ती वापरणे काळाची गरज बनली आहे. त्यादृष्टीने प्रशालेत विद्यार्थ्यांना इकोफ्रेंडली गणेशमूर्ती बनवण्याचे धडे देण्यात आले. यावेळी इ.४ थी च्या विद्यार्थ्यांना कार्यानुभव शिक्षक व प्रसिद्ध आर्टिस्ट सागर कांबळे वर्गशिक्षिका चंदना तामखडे व प्रियांका पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कलाकृती संस्थेचे संस्थापक रघुराज मेटकरी, अध्यक्षा रेखा शेंडगे, प्राचार्या वैशाली कोळेकर, कार्यवाह योगेश्वर मेटकरी प्रशालेचा शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी व पालकाकडून विद्यार्थ्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# खड्ड्यात वृक्षारोपण करून शिवसेनेचे आंदोलन

### सातारा नगरपालिका व पीडब्ल्यूडी विभागाचा केला निषेध



**सातारा : हॅलो प्रभात**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने सोमवारी सातारा शहरात ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून सातारा पालिकेच्या ढिसाळ कारभाराचा निषेध केला .तसेच सार्वजनिक बांधकाम विभागालाही या प्रकारासाठी जबाबदार धरण्यात आले . या आंदोलनामध्ये सातारा शहर संघटक प्रणव सावंत उपशहर प्रमुख गणेश अहिवळे उपजिल्हा संघटक सादिक बागवान राहुल जाधव श्रीकांत पवार सुनील पवार आकाश पवार सुनील भोसले हे सहभागी झाले होते.

शिवसैनिकांनी येथील राधिका रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून सातारा पालिकेच्या कारभाराचा निषेध केला आवाज कोणाचा शिवसेनेचा,पाचशेत विकले जाल तर असेच रस्ते पहाल अशा उपरोधिक घोषणा यावेळी शिवसैनिकांनी दिल्या .या आंदोलनाबाबत बोलताना शहर संघटक प्रणव सावंत म्हणाले सातारा पालिकेने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे जे रस्ते ठेकेदारांना कराराने दिलेले आहेत त्या ठेकेदारांना दुरुस्ती करून घेणे ही नगरपालिकेची जबाबदारी आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग या संदर्भात भूमिका घेताना दिसत नाही पावसाची तांत्रिक अडचण वगळली तरी यापूर्वीचे रस्ते दर्जेदार असते तर हा प्रकार उद्भवलाच नसता या संदर्भात पालिकेने योग्य वेळी भूमिका घेतली नाही तर शिवसैनिक याहीपेक्षा जास्त तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील असा इशारा त्यांनी दिला.

## कोतोलीत महिलांसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षण शिबिर संपन्न



**कोतोली : हॅलो प्रभात**

कुटुंब लहान, सुख महान - बालविवाह टाळा, कुटुंब नियोजन करा या घोषवाक्यासह ग्रामपंचायत कोतोली यांच्या वतीने १५व्या वित्त आयोगांतर्गत महिलांसाठी आणि युवतींसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात मुलींना स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण, महिलांसाठी व्यवसायविषयक मार्गदर्शन, दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनावरील कार्यशाळा तसेच महिला आरोग्य शिबिर घेण्यात आले. आरोग्य शिबिरात महिलांच्या हिमोग्लोबिनची तपासणी सखाराम लव्हटे यांनी करून उपस्थितांना चिक्कीचे वाटप करण्यात आले.

यावेळी शांताबाई पाटील यांच्यासह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सरपंच वनिता पाटील, उपसरपंच अजित पाटील, ग्रामपंचायत अधिकारी आर. जी. वळवी, ग्रामस्थ, ग्रामपंचायतीचे सदस्य, सदस्या आणि कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे गावातील महिलांना आरोग्याविषयी जागरूकता मिळून त्यांचा आत्मविश्वास वाढेल तसेच स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध होतील, असे सरपंच पाटील यांनी सांगितले.

# बेघरांच्या प्रश्नासाठी शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांना भेटू : डॉ. स्वाती पाटील



**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

विमुक्त जाती भटक्या जमाती मागासवर्गीय तसेच इतर सर्व घटकातील ज्या कुटुंबाकडे पक्के घर नाही व घर बांधण्यासाठी स्वमालकीची जागा नाही अशा गरजु कुटूंबांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी संघटनेचे अध्यक्ष भिमराव साठे व शिष्टमंडळांसह लवकरच मुख्यमंत्र्याना भेटून हा प्रश्न सोडवणार असलेचे प्रतिपादन भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचीव डॉ.स्वाती दिपक पाटील यांनी केले. भटका समाज मुक्ती आंदोलन या सामाजिक संघटनेच्या वाठार- वडगांव रोडवरील इरा हॉलमध्ये संपन्न झालेल्या परिवर्तन संकल्प मेळाव्यात अध्यक्षस्थानावरून डॉ. पाटील बोलत होत्या.

स्वागत शालेय विद्यार्थी हार्दिक प्रदीप लोंढे यांने केले तर प्रस्ताविकातुन सिनेकलाकार रमेश डोंगरे यांनी संघटनेच्या संघर्षातून केलेल्या यशस्वी कार्याचा आढावा घेतला. डॉ. स्वाती पाटील पुढे म्हणाल्या,' तळागाळातील शेवटच्या माणसाला हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी अविरतपणे संघर्ष करत असलेल्या भिम रावबापु यांच्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक करत यापुढे गोरगरीबांचे प्रश्न सोडवणेसाठी मी आपले संघटनेसोबत कटीबध्द राहणार.भिमराव साठे म्हणाले,' गेल्या १५ वर्षापासुन अनेक आंदोलने केली,

परंतु प्रशासनावर विश्वास ठेवून होतो म्हणुनच आजतगायत पेठ वडगाव येथील ४१३ घरांच्या गृह प्रकल्पासाठी,टोप व पारगाव येथील ६० घरांच्या वसाहतींसाठी एकुण ७ एकर जमीन मंजुर करून आणली आहे.

यावेळी वैभव हिरवे, जयसिंग पाटील,संजय धोंगडे, प्रदीप लोंढे,सुरेश महापुरे,बेबीताई गोसावी, शाम राव जाधव,रेणुका माळवे,संजय चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वारणा विद्यापीठ अंतर्गत लॉ कॉलेजला मान्यता

**वारणानगर : हॅलो प्रभात**

वारणा विद्यापीठ शिक्षण क्षेत्रात आणखी एक महत्वाचा टप्पा गाठत आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू होणाऱ्या वारणा स्कूल ऑफ लॉ महाविद्यालयाला बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली आहे. महाविद्यालयात प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सीईटी पोर्टल वर ऑप्शन फॉर्म भरताना वारणा स्कूल ऑफ लॉ (इन्स्टिट्यूट कोड ३५००१) निवडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

येथे तीन वर्षांचा LL.B. (पदवीधरांसाठी) तसेच पाच वर्षांचे B.., LL.B. आणि B.B.., LL.B. (१२ वी नंतर एकात्मिक अभ्यासक्रम) असे दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध राहणार असून, प्रवेश महाराष्ट्र CET द्वारेच होणार आहे. कायदा शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी न्यायालयीन सेवा, कायदेशीर सल्ला देण्याचे क्षेत्र, सरकारी नोकऱ्या, कॉर्पोरेट क्षेत्रातील कायदेशीर जबाबदाऱ्या तसेच उच्च शिक्षण व संशोधन यामध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी महाविद्यालयात अनुभवी प्राध्यापकवर्ग, सुसज्ज मूट कोर्ट हॉल, समृद्ध ग्रंथालय, आधुनिक पायाभूत सुविधा, तसेच इंटर्नशिप आणि प्लेसमेंटचे मार्गदर्शन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या यशस्वी उपक्रमामागे वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांचे मार्गदर्शन व पाठबळ, आणि श्री वारणा विभाग शिक्षण मंडळातील विविध पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# कॉलेजबाहेरच्या टवाळखोरांवर कारवाई करा : युवासेनेची मागणी



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शहरातील कॉलेज परिसरात वाढत्या टवाळखोरी, गटबाजी व मुलींच्या छेडछाडीच्या प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी कोल्हापूर युवासेना उबाठा तर्फे जिल्हा प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले. कॉलेज सुटण्याच्या वेळेला बाहेर उभे राहून मुलींना त्रास देणारे, नशेच्या पदार्थांची विक्री करणारे, कर्कश्य आवाजात मोटारी फिरवणारे टोळके दिवसेंदिवस वाढत असल्याचा आरोप युवासेनेने केला. निर्भया पथक, डीबी पथक, बिट मार्शल, पेट्रोलिंग मोबाईल असूनही हे प्रकार सुरुच आहेत, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रत्येक कॉलेजबाहेर सुटण्याच्या वेळी महिला पोलीस नेमून, पथके ॲक्टिव्ह करून कारवाई करावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी युवासेना रस्त्यावर उतरेल, असा इशारा देण्यात आला.हे निवेदन शहर डिव्हायएसपी प्रिया पाटील यांना देण्यात आले. त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे व सूचना मिळताच कारवाईचे आश्वासन दिले. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख मंजित माने, चैतन्य देशपांडे, सदाशिव पवार, पवन तोरसकर, सुनील चौगुले, सनराज शिंदे, तृप्ती विभुते, प्रद्या लोणारे, सानिका दामूगडे, माधुरी जाधव, अक्षय घाटगे, ऋषींकेश जोशी, संग्राम पाटील आदी उपस्थित होते.

## शालेय शासकीय कराटे स्पर्धा संपन्न

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा क्रीडा कार्यालय आणि इचलकरंजी महापालिकेच्यावतीने येथे १४ आणि १९ वर्षाखालील शालेय शासकीय कराटे स्पर्धा झाल्या. यामध्ये कु. ईश्वरी चोथे हिचा तृतीय क्रमांक आला. कराटे खेळात पहिल्या आलेल्या अंजली भस्मे आणि राजनी कामत यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# भेडसगाव नागरी पतसंस्थेला २ कोटी २ लाखांचा नफा

## हंबीरराव पाटील




**शिराळा : नारायण घोडे-पाटील**

ग्राहकांच्या मनात पारदर्शी व विश्वासार्ह कारभाराचा वस्तुपाठ निर्माण केलेली सहकारातील मानबिंदू गौरव पुरस्कार प्राप्त, ग्रामीण भागातून शहरी भागाकडे यशस्वी वाटचाल करत ओळख निर्माण केलेल्या भेडसगाव नागरी पतसंस्थेला या आर्थिक वर्षात निव्वळ नफा दोन कोटी तेरा लाख इतका झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती हंबीरराव पाटील भेडसगावकर यांनी दिली. ते संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.ते म्हणाले, संस्थेकडे सध्या मार्च २०२५ अखेर भाग भांडवल व निधी २० कोटी लाख असून गतवर्षीच्या तुलनेत या ठेवीमध्ये १२.४१% वाढ होऊन एकूण ठेवी १८० कोटी २ लाख इतक्या झाल्या आहेत. तसेच कर्ज वाटपामध्ये १६.९८% वाढवून १२३ कोटी ६२ लाख इतके कर्ज वाटप केले आहे. तसेच उल्लेखनीय बाब म्हणजे संस्थेने सध्या ९८% कर्ज वसुली केली असून थकबाकी २% आहे.हे ग्रामीण भागात काम करणाऱ्या संस्थांसाठी आदर्शवत आहे. संस्थेचा नेट एनपीए १.६६% इतका राखण्यात यश मिळवले आहे. थकबाकी २% आहे. संस्थेच्या व्यवसायामध्ये १५% नी वाढ होऊन मिश्र व्यवसाय ३०३ कोटी पर्यंत पोहोचला आहे. संस्थेच्या एकूण ठेवी १८० कोटी असून रोख व बँक शिल्लक ५. कोटी,८१ लाख बँकेतील गुंतवणूक ७०.३१ कोटी, ठेवतारण कर्जे ६.३७ कोटी, सोने तारण कर्जे ४७.६१ कोटी अशी एकत्रित रक्कम १३०.१० कोटी असून त्याचे संस्थेच्या ठेवीशी प्रमाण ७२.२७% आहे.या सभेस व्हा. चेअरमन पांडुरंग डांगे, संग्राम पाटील, संस्थेचे जनरल मॅनेजर संजय पाटील,संचालक मंडळ-आप्पाजी पाटील, विठ्ठल कुसळे, इंदुबाई पाटील, सुरेश पाटील आदी सभासद, गुणवंत पाल्यांचे पालक उपस्थित होते.

# उपायुक्तांची कारवाईची भूमिका संशयास्पद?

## दोषी कर्मचारी,अधिकाऱ्यांवरील कारवाई कागदोपत्रीच ■ पालिका आयुक्तांची भूमिका ठरणार निर्णायक

**पुणे : सोमनाथ साळुंके**

पालिकेच्या येरवडा क्षेत्रीय कार्यालयात सर्रासपणे दारूची पार्टी करणाऱ्या व सुरक्षा रक्षकाच्या श्रीमुखात मारणाऱ्या वाहन चालकासह त्यांना पाठीशी घालणाऱ्या सहायक आयुक्तावर रीतसर कारवाई करण्याबाबत वारवार पालिका उपायुक्तांना भेटण्याचा प्रयत्न करून सुद्धा त्यांची भेट होत नसल्याने अशा कर्मचारी व अधिकाऱ्यांवरील होणारी कारवाई ही कागदोपत्रीच राहिल्याने उपायुक्तांच्या कारवाईची भूमिका संशयास्पद वाटू लागली आहे.




पुणे महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या पुणे-नगर रोड महामार्गावर असलेल्या येरवडा भागातील येरवडा,धानोरी,कळस क्षेत्रीय कार्यालयात पालिकेत सेवेत असलेल्या व त्यांना पाठीशी घालणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सावळा गोंधळ सुरू असल्याची कुजबुज दैनिक हॅलो प्रभात वृत्तपत्राच्या प्रतिनिधीस समजल्यावर क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात काही महिन्यापासून प्रतिनिधींचे स्टिंग ऑपरेशन सुरू होते. क्षेत्रीय कार्यालयात मुकादम पदावर कार्यरत असलेला कर्मचारी (गुरुवार दि.७) रोजी क्षेत्रीय कार्यालयातूनच संध्याकाळच्या सुमारास दारूच्या नशेत झिंगाट होऊन बाहेर पडताना त्यास हॅलो प्रभात वृत्तपत्राच्या प्रतिनिधींने हटकल्यावर त्याची परिस्थितीनुसार त्यास व्यवस्थित चालता व स्वतःचे नाव देखील सांगता येत नव्हते.यावेळी येथे असलेल्या परिमंडळ ४ पोलिस उपआयुक्त कार्यालयात काही महिला कामासाठी आल्या असताना बेवड्या कर्मचाऱ्याचे असलेले रूप पाहून त्यांना देखील मनात धास्ती भरली होती. यावेळी संबंधित कर्मचाऱ्याच्या गळ्यात पालिकेचे ओळखपत्र असल्यामुळे दारूड्या कर्मचाऱ्यामुळे कार्यालयात येणाऱ्या महिला असुरक्षित असल्याचे स्पष्ट होत होते. या घटनेला पाच दिवस देखील होत नाही. तोच सहायक आयुक्तांच्या वाहनावर चालक म्हणून काम पाहणाऱ्या चालकाचा महाप्रताप उजेडात आला. संबंधित चालकाने रात्रपाळीस कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकाच्या दारूच्या नशेत श्रीमुखात दिल्याने हा परिसरात चर्चेचा विषय बनला. येथील कार्यालयात सध्या प्रभारी सहायक आयुक्त पदाचा कार्यभार सांभाळत असलेले अशोक भवारी यांच्याशी फोनवर व प्रत्यक्ष भेटून घटनेची माहिती त्यांना दिल्यावर अशा दोषी पालिकेच्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याऐवजी दारू पिणाऱ्या कर्मचाऱ्यास नोटीस देऊन चालकास समज दिल्याचा दावा केल्याने त्यांनी घेतलेली भूमिका शंकास्पद वाटून वरिष्ठ अधिकारी हे कर्मचाऱ्यांची पाठराखण करत असल्याचे त्यांनी केलेल्या दाव्यामुळे स्पष्ट झाली होती.

त्यामुळे दोषी असलेल्या कर्मचाऱ्यावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर पालिका उपायुक्त माधव जगताप यांनी कारवाईबाबत कोणती भूमिका घेतली, याची शहानिशा करण्यासाठी हॅलो प्रभात वृत्तपत्राचे प्रतिनिधी गेल्या पंधरा दिवसापासून ते कार्यरत असलेल्या ढोले-पाटील रोड येथील क्षेत्रीय कार्यालयात भेटण्याचा प्रयत्न करत असताना येथील कर्मचाऱ्यांकडून देखील उडवाउडवीची उत्तरे मिळून ते रजेवर असल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत असताना जर प्रतिनिधींनाच अशा प्रकारचा अनुभव येत असेल तर सर्वसामान्य जनतेला न्याय मिळविण्यासाठी चकरा मारण्याशिवाय पर्याय नसून पालिकेच्या सहायक आयुक्तांसह उपायुक्तांच्या कार्यभार संदर्भात शंका उपस्थित होऊन त्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. संबंधित उपायुक्तांना (गुरुवार दि.१४,सोमवार दि.१८ व शुक्रवार दि.२२)रोजी प्रत्यक्ष भेटण्याचा प्रयत्न करून देखील ते न भेटल्यामुळे त्यांच्या कामकाजाबाबत शंका उपस्थित होऊन जनतेचे मुख्य असलेले प्रश्न सोडविण्याऐवजी बेवड्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी.जेणे करून येथे कामानिमित्त येणाऱ्या महिला कर्मचारी व इतर महिला सुरक्षित राहतील.अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली असून जर संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास पालिकेचे उपआयुक्त असमर्थ ठरत असतील तर जनतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनून महिलांच्या सुरक्षिततेबाबत पालिका अधिकाऱ्यांच्या वागणुकीबाबत शंका उपस्थित होऊन महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा बेवड्या कर्मचाऱ्यामुळे व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे ऐरणीवर येऊन आता यावर पालिका आयुक्त कारवाईबाबत काय?निर्णय घेणार याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष वेधून राहिले आहे.

**पालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातच जर दारूड्या कर्मचाऱ्यांकडून दारूच्या नशेत अशा प्रकारचे महापराक्रम होत असतील तर दोषी असलेल्या व त्यांना पाठीशी घालणाऱ्यावर कर्मचारी,अधिकाऱ्यावर कारवाई होणे गरजेचे असून यामुळे झालेल्या घटनेमुळे महिलांच्या मनातील भिती कमी होईल.**

●स्वप्नील माने,
(प्रदेश उपाध्यक्ष,सामर्थ्य जनशक्तीसंघटना )

**सध्या समाजात महिलांवरील अत्याचाराच्या घटना दिवसेदिवस वाढत असताना दुसरीकडे जर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच जर दोषी कर्मचाऱ्यावर कारवाई होण्याऐवजी पाठराखण करण्याचे काम होत असेल तर वरिष्ठ अधिकारी अशा वाढत्या घटनांना खतपाणी घालण्याचे काम करत असल्याचे स्पष्ट होत आहे.**

●महेश पाटील,
(उपाध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अप)गट )

---



## सह्याद्री हॉस्पिटल मध्ये हृदयरोग शस्त्रक्रिया उपलब्ध

**कराड : अनिल मोरे**

येथील सह्याद्री सुपर स्पेशियालिटी हॉस्पिटल, कराड हे गेली १३ वर्षांहून अधिक काळापासून सर्व प्रकारच्या उपचारांची सुविधा कराड मधेच उपलब्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले आहे. परिपूर्ण हृदयरोग व हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग हे त्यांचे विशेष प्रावीण्य एक दशकाहुन काळ अधिक राहिले आहे, आणि गेल्या एका वर्षापासून हा विभाग अनेक नविन प्रयत्न करात आहे. ज्यामुळे लहान शिशुनपासून ते वृद्धांपर्यंत सर्व प्रकारच्या गुंतागुंतीच्या हृदयरोग व हृदयरोग शस्त्रक्रिया जागतिक दर्जाच्या बरोबरीने सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये होत आहेत.

असे सह्याद्रि सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे हृदयशस्त्रक्रिया तज्ज्ञ, डॉ.अमृत नेर्लीकर हे पत्रकार परिषदेवेळी बोलत होते.

ते पुढे म्हणाले, ‟गेली अनेक वर्षे मी पश्चिम महाराष्ट्रामध्ये हृदयशास्त्रक्रिया करत आहे, सह्याद्रि सुपर स्पेशियालिटी हॉस्पिटल, कराड हृदयरोग उपचारांसाठी योग्य असण्याचे कारण म्हणजे सर्व अनुभवी तज्ज्ञांची एकत्रित उपलब्धता, यामुळेच सर्व गुंतागुंतीच्या हृदयरोग शस्त्रक्रिया आम्ही येथे सहज करू शकतो. नुकतीच ४६ वर्षीय रुग्णावर आम्ही यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया केली, त्याला ट्रिपल व्हेसल डीसीज म्हणजे तिन्ही हृदयाच्या वाहिन्या बंद होत्या, यासाठी बायपास शस्त्रक्रिया आम्ही लिमा रीमा नामक तंत्र वापरून केली, यामध्ये पायाच्या शिरेऐवजी हृदयाच्या डाव्या आणि उजव्या इंटर्नल मेमरी आर्टेरि नामक धमन्या वापरल्या जातात, या साठी विशेष प्राविण्य व प्रदीर्घ अनुभव असणे अगदी महत्वाचे ठरते. या धमन्या वापरल्याने पारंपरिक शस्त्रक्रिया पेक्षा परिणाम हे अधिक चांगले व दीर्घकालीन टिकणारे असल्याचे सिद्ध झाले आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत अगदी लवकर सुधारणा झाली आणि अगदी ४ दिवसांमध्ये रुग्णाला डिस्चार्ज करणे आम्हाला शक्य झाले असे ते म्हणत होते. यावेळी सह्याद्री सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चे संचालक दिलीप चव्हाण, डॉ. अमृत नेर्लीकर ,डॉ .हर्षवर्धन सायगावकर, डॉ. राजेश कौशिश, डॉ. रामप्रसाद चव्हाण, डॉ. जमीर कामटे ,डॉ. चंद्रकांत चव्हाण ,डॉ. सचिन निकम, डॉ. राहुल वलेकर, डॉ. राम देसाई, डॉ. महेश देशमुख व हॉस्पिटल मधील सर्व स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.

---

## साळमुख- पिलीव रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात

### ‘हॅलो प्रभात’च्या बातमीचा इफेक्ट

**पिलीव : रघुनाथ देवकर**

सातारा पंढरपूर रस्त्यावरील महामार्गाचे काम बऱ्याच प्रमाणात पूर्ण होत आले असून साळमुख -पिलीव या रस्त्यावरील अपूर्ण कामामुळे व जागोजागी मोठ मोठाले खड्डे पडल्याने ‟खड्ड्यात पाणी का पाण्यात खड्डा” अशी परिस्थिती असून वाहन चालकाला रस्ताच दिसत नाही .अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या रस्त्यावरती गेल्या अनेक दिवसापासून अनेक अपघात केवळ या खड्ड्यांमुळे झालेले आहेत .याबाबत संबंधित खात्याला अनेक वेळा वर्तमानपत्र, निवेदने याद्वारे विनंतीने कळकळीने सांगूनही फायदा झाला नाही. सतत या विभागाकडून नागरिकांच्या सूचनेला केराची टोपलीच दाखवत आहेत



.चालू परिस्थितीमध्ये सुद्धा या रस्त्यातून जाताना शेतकरी वर्ग, कामगार वर्ग, शालेय विद्यार्थी, त्याचप्रमाणे दुचाकी चार चाकी व मोठ्या वाहनांनाही मोठ्या प्रमाणात त्रासदायक होत असून या रस्त्यावरून जात येत असताना आपण जिवंत राहू की न राहू अशा प्रकारची परिस्थिती दिसत आहे. सदर कामाबाबत दैनिक हॅलो प्रभातने २१ ऑगस्टला


महामार्गावरील अपूर्ण कामामुळे अपघाताला आमंत्रण

बातमी लावताच त्याच दिवशी सदरच्या कामावरती संबंधित खात्यामार्फत असो किंवा ठेकेदारांमार्फत असो काम सुरू केल्याचे वाहनांच्या लगबगीवरून दिसत आहे .तरीसुद्धा काम सुरू केल्याचा देखावा आहे की, काय ही परिस्थिती प्रत्यक्षात पूर्ण रस्ता झाल्यानंतरच दिसून येणार आहे. अशी अनेक ग्रामस्थांची वाहन चालकांची मालकांची धारणा आहे . सदर ‟हॅलो प्रभात” च्या बातमीत आंदोलनाचा इशारा देताच प्रशासन कामाला लागल्याचे तूर्त तरी दिसत आहे.

---



## गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा

### श्री सावळसिद्ध विकास सोसा.तर्फे यशस्वी तरुणांचा गौरव

**तासगाव : हॅलो प्रभात**

तासगाव तालुक्यातील सावळज येथील श्री सावळसिद्ध विकास सोसायटीतर्फे गावातील दोन यशस्वी तरुणांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रतिक विलास तोडकर यांची नॅशनल सीड कॉर्पोरेशन, दिल्ली येथे ट्रेनी ॲग्री स्टोअर या पदावर तर सागर बबन पाटील यांची ग्राम महसूल अधिकारी पदावर झालेल्या निवडीबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.सत्कार कार्यक्रमाला सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, सर्व संचालक मंडळ, सभासद तसेच सोसायटीचा सर्व कर्मचारीवर्ग उपस्थित होता. यावेळी बोलताना सोसायटीचे माजी चेअरमन व पॅनल प्रमुख ऋषिकेश बिरणे म्हणाले, या दोन्ही निवडीमुळे सावळज गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. गावातील तरुणांनी केलेले हे यश संपूर्ण गावासाठी अभिमानास्पद आहे.यावेळी सोसायटीचे चेअरमन बंडू पाटील, व्हा. चेअरमन विनायक पवार, शिवाजी पाटील,दत्तात्रय पाटील, संदीप माळी,प्रदीप माळी, सचिव मछिंद्र पाटील, बबन पाटील, बाबू मस्के, सुतार मामा उपस्थित होते.

---

## बोरगाव येथे पूरग्रस्त कुटुंबांच्या घरांचा सर्वे

**बोरगाव : हॅलो प्रभात**



बोरगाव (ता.वाळवा) येथे गेल्या दोन दिवसापासून कृष्णा नदीच्या पुरात बोरगावसह नदी काठावरची सर्व गावे गेली दोनदिवस पाण्याखाली होती. पुरामुळे घुसलेले पाणी ओसरले असून पूरबाधित कुटुंबांचा सर्वे प्रशासनाच्या वतीने सुरू करण्यात आला आहे. बोरगाव गावातील विस्कटलेले जनजीवन पूर्वपदावर येत आहे. गावातील जवळपास ७ घरात पाणी जाऊन आर्थिक नुकसान झाले आहे. या कुटुंबांना शासनाच्या वतीने नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रशासनाच्या वतीने मंडल अधिकारी विनायक यादव, ग्रामविकास अधिकारी आर पी रजपूत, तलाठी भैरवनाथ जामगुंड, तलाठी निखिल पाटील, कृषी सहाय्यक श्रीकांत मंडले, ग्रामपंचायत सदस्य सचिन देसाई यांच्यासह कर्मचारी पूरबाधित कुटुंबांचा सर्वे करत आहेत.

---

## आजही संत तुकोबांचे अभंग अजरामर आहेत

**प्रा.डॉ.दादाराम साळुंखे**
**कराड : हॅलो प्रभात**

लेखन करणे म्हणजे जीवनात आलेले अनुभव विश्व मांडणे होय. साहित्याची निर्मिती ही सहजपणे होत नाही. तर ती स्वअनुभवातून, आनंदातून होत असते. म्हणूनच आजही संत तुकोबांचे अभंग अजरामर आहेत असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.दादाराम साळुंखे




यांनी केले. ते वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडच्या कनिष्ठ विभागाच्या भाषा, वाड:मय, वादविवाद स्पर्धा व राष्ट्रीय सेवा योजना या समित्यांच्या उद्घाटन समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, विध्यार्थ्यांना आईच्या डोळ्यातले पाणी दिसले पाहिजे. कारण जीवनातली सात वर्ष मेहनत घेतली तर पुढील सत्तर वर्षाची शिदोरी तयार होते.

अध्यक्षीय मनोगतात प्रभारी प्राचार्या डॉ.एस.आर. सरोदे यांनी विध्यार्थ्यांना एन. एस. एस च्या सर्व उपक्रमात सहभागी होण्याची संधी आहे. कारण समाजसेवेतूनच मानवसेवा घडत असते असे मत व्यक्त केले.

यावेळी उपप्राचार्य आर.ए. कांबळे पर्यवेक्षिका एस. एस. मधाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम अधिकारी पवार एस. पी. यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.डॉ. एस. एस. लावंड यांनी परिचय करून दिला. डॉ. पी. एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. के. एस. महाले यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास प्राध्यापक व विध्यार्थी - विध्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

---

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सुधारित अभ्यासक्रमावर कार्यशाळा

**सांगली : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार कला शाखेतील द्वितीय वर्षाच्या शारीरिक शिक्षण आणि भूगोल विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा संपन्न झाली.




सदर कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी कणसे लाभले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पोरे, डॉ. एम. ए. कदम-पाटील, डॉ. बी.एस.जाधव, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. आर. सुपले, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. रुपाली कांबळे, डॉ. महेश कोल्हाळ आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारती विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यशाळेचे स्वागताध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. पोरे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, विद्यापीठातील प्रत्येक विषयाचे अभ्यास मंडळ अत्यंत विचारपूर्वक सुधारित अभ्यासक्रमाची रचना करत असते. त्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन केले जाते. मला खात्री आहे की, आजच्या या दोन्ही विषयांच्या कार्यशाळेच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापण प्रक्रिया सुलभ होण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक आपणास मौलिक मार्गदर्शन करतील आणि विद्यार्थी केंद्रीय शिक्षण प्रक्रिया अधिक समृद्ध करतील. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ.कणसे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण हे प्रामुख्याने कौशल्यावर आधारित आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आणि कौशल्यांचा विकास करण्यासाठी या धोरणाचा निश्चित लाभ होईल. त्यासाठी शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भूगोल व शारीरिक शिक्षण या विषयांतून जीवन कौशल्ये विकसित होतात. पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा जवळचा संबंध आहे. या दोन्ही विषयांचा सखोल ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे आणि या नवीन शैक्षणिक धोरणाचे सर्वांनी स्वागतच केले पाहिजे असे प्रतिपादन केले.

बीजभाषक म्हणून उपस्थित असलेले शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. एम. ए. कदमपाटील तसेच भूगोल अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. बी. एस. जाधव यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. महेश कोल्हाळ यांनी केले. तर आभार डॉ. रुपाली कांबळे यांनी मानले. तसेच सूत्रसंचालन प्रा.रोहिणी वाघमारे यांनी केले.

या कार्यशाळेला शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षण व भूगोल विषय शिकवणारे प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



## अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव कराड येथे संपन्न

**शिराळा : नारायण घोडे-पाटील**

कराड येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती महाराष्ट्र राज्य

या संस्थेच्या वतीने त्यांच्या १०५ वी जयंती सोहळ्याचा समाज प्रबोधन मेळावा व सन्मान सोहळा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण स्मृती भवन टाऊन हॉल कराड येथे संपन्न झाला.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सौजन्याने व मीरा-भाईंदर कुस्तीगीर संघ संचालित श्री गणेश आखाड्याचे वस्ताद वसंतराव य.पाटील यांना त्यांनी केलेल्या कुस्ती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच श्री गणेश आखाड्याची स्थापना करून अनेक राष्ट्रीय , राज्यस्तरीय पदक विजेते व होतकरू मल्ल घडविल्याबद्दल त्यांचा समाज गौरव पुरस्कार २०२५ रॅमन मॅगसेस व पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ.प्रकाश आमटे व डॉ.सौ.मंदाकिनी आपटे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे, प्रा.डॉ.शरद गायकवाड (महावीर विद्यालय कोल्हापूर) , महागायक शाहीर चंदन कांबळे , अभिनेत्री कु.शिवानी मुंडेकर तसेच जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष मा.राम दाभाडे शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त पै.माननीय नजरुद्दीन नायकवडी , मा.प्रा.अमोल साठे आशियाई सुवर्ण पदक विजेते व एन.आय.एस कुस्ती कोच तसेच अंत्री बुद्रुक गावचे प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते .



# मी पुन्हा स्मशानभूमीत उपोषणाला बसणार ; वसंत साळुंखे यांचा एल्गार

## दौंड विधानसभा मतदारसंघातून ३१ हजार मतदारांची नावे गायब ; निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ

**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ मध्ये मतदार यादीतून एक नव्हे दोन नव्हे तर चक्क ३१ हजार मतदारांची नावे बेकायदेशीर व नियमबाह्य पद्धतीने हटवण्यात आली असल्याचा दावा शिवसंग्राम संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत साळुंखे यांनी वेळोवेळी निवडणूक आयोगाकडे केला आहे. मागील उपोषण स्थगित करतेवेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने मी पुन्हा एकदा पाटस ( ता. दौंड ) येथील स्मशानभूमीत उपोषणाला बसणार असल्याचे जाहीर केले आहे. २०१९ च्या झालेल्या निवडणुकीत दौंड विधानसभा मतदारसंघाची एकुण मतदान संख्या ३ लाख ९ हजार होती. त्यानंतर २०२४ च्या निवडणुकीत मतदान संख्या वाढण्या ऐवजी ५००० हजार मतदारांची संख्या घसरणीवर आली. २०१९ ते २०२४ या पाच वर्षाच्या कालावधीत २६५०० मतदारांची नव्याने नोंदणी झाली. म्हणजेच २०१९ ची एकूण मतदार संख्या ३ लाख ९ हजार अधिक २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत या पाच वर्षांत नवीन नोंदणी झालेले २६५००



मतदार संख्या म्हणजेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दौंड विधानसभा मतदारसंघाचे मतदार संख्या ३ लाख ३५ हजार ५०० व्हायला हवी होती. परंतु यामध्ये निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारामुळे २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत ३१ हजार मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले.

या संपूर्ण घटनेची चौकशी व्हावी यासाठी निवडणूक आयोग नवी दिल्ली, निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी पुणे यांना वेळोवेळी पाठपुरावा करून संपूर्ण बेकायदेशीर व नियमबाह्य पद्धतीने मतदार नावे वगळण्याच्या प्रक्रियेची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व ३१ हजार मतदारांना मतदानापासून वंचित न ठेवता त्यांची नावे पुन्हा २०२४ च्या विधानसभेच्या निवडणूकीत समाविष्ट करावीत अशी लेखी मागणीचा पाठपुरावा करून सुद्धा निवडणूक आयोगाने याबाबतची दखल घेतली नाही. वंचित ठेवलेल्या नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता आलेला नाही.

निवडणूक आयोगाने याबाबतची कोणतीही दखल घेतली नसल्याने आयोगाच्या विरोधात पाटस स्मशानभूमीत निवडणूक आयोगाचा निषेध म्हणून उपोषण केलेले होते, त्यांनतर निवडणूक आश्वासनाची फक्त खैरात केली परंतु दिलेल्या आश्वासनाकडे कानाडोळा करीत कोणतीही कारवाई केली नाही. मी केलेल्या मागणीच्या अर्जावर कोणतीच दखल घेतली नाही, तर सदरचे उपोषण पुन्हा सुरू करण्यात येईल असे त्यावेळी जाहीर करण्यात आलेले होते. आज अखेर निवडणूक आयोगाने कोणत्याही प्रकारची चौकशी करून कारवाई केलेली नसल्याने मी या ३१ हजार मतदारांच्या न्याय व हक्कासाठी निवडणूक आयोगाच्या निषेधार्थ पाटस येथील स्मशानभूमीत उपोषणाला बसणार असल्याची माहिती शिवसंग्राम संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत साळुंखे यांनी दिली.

# स्वाती कोरडे यांना पृष्ठ समन्वयक पुरस्कार



**राहुरी : हॅलो प्रभात**

सातारा टीचर्स फाउंडेशनच्या वतीने स्वाती राहुल कोरडे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे अधिकारी सांगळे यांच्या हस्ते उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्यानिमित्ताने कांता तनपुरे युवा मंच आणि नाभिक समाज राहुरीच्या वतीने त्यांचा सत्कार अध्यक्ष कांता तनपुरे हस्ते करण्यात आला. यावेळी स्वाती कोरडे यांच्या समन्वयक पदाच्या कार्याचा अनेकांनी गौरवाने उल्लेख केला. त्यांनी करा बद्दल सर्वांचे आभार मानले. यामुळे आपण भारावून गेलो असून अधिक गतिशील काम करण्याचा संकल्प केला. यावेळी भारतराव कोरडे,राहुल कोरडे, मिनाक्षी कोरडे, अश्विनी कोरडे,भाऊसाहेब बिडवे, सुनिल कोरडे, सुजित कोरडे, किरणं कोरडे, विशाल शेजुळ, सोनु साठे, रवींद्र कोरडे आणि वैशाली कोरडे उपस्थित होते.

# ‘मैं हू डॉन गाण्यावर’ आ.सुरेश भाऊंनी धरला ठेका



यावर्षी शिवाजी युवक गोविंदा पथकाची हॅट्रिक

**मिरज : हॅलो प्रभात**

आ.सुरेशभाऊ खाडे युवा मंच आणि युवा नेते सुशांतदादा खाडे यांच्या तर्फे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन सलग तिसऱ्या वर्षी मिरज हायस्कूल मिरज शाळेच्या क्रीडांगणावर करण्यात आले होते, ही दहीहंडी फोडण्यासाठी राज्यातील नावाजलेले गोविंदा पथकांनी हजेरी लावली होती. ही दहीहंडी शिवाजी युवक गोविंदा पथक तासगाव यांनी फोडून हॅट्रिक नोंदवली आहे. विशेष म्हणजे सांगली जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार सुरेशभाऊ खाडे आणि युवा नेते सुशांतदादा खाडे यांनी मैं हु डॉन या गाण्यावर ठेका धरला होता. यावेळी आमदार सुधीर दादा गाडगीळ, आमदार सत्यजित देशमुख, जनसूराज्य शक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, मकरंद भाऊ देशपांडे, ज्येष्ठ नेते सुरेश बापू आवटी, संदीप आवटी, निरंजन आवटी, संजय बापू मेंढे, करन जामदार, भारतीय जनता पार्टीचे सांगली जिल्ह्यातील पदाधिकारी तसेच मिरज विधानसभा क्षेत्रातील सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्यासह आबाल वृद्धांनी हजारोंच्या संख्येने हजेरी लावली होती.

# प्रा.अरुण तुपविहीरे यांना गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

**राहुरी : हॅलो प्रभात**

सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय कृषी विद्यापीठ राहुरीचे उपक्रमशील मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे यांना अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघामार्फत दिला जाणारा गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार देण्यात आला आहे. हा कार्यक्रम अहिल्यानगर येथे नुकताच पार पडला. पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे,शिक्षण अधिकारी संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (योजना) बाळकृष्ण बुगे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित आदी मान्यवरांच्या हस्ते



पुरस्कार प्रदान करण्यात आला. तुप विहीरे यांनी मुख्याध्यापक पदाची धुरा सांभाळल्यापासून विद्यालयात अनेक नाविण्यपूर्ण बदल केले.विज्ञान शिक्षक असल्याने विद्यालयात गणित प्रयोगशाळा,आकाश निरीक्षणासाठी दुर्बीण सुविधा तसेच विद्यार्थी गुणवत्तेसाठी अनेक उपक्रम राबवले आहे .या उपक्रमाची नोंद म्हणून विद्यालयाला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात द्वितीय क्रमांक प्राप्त होऊन १५ लाखाचे बक्षीस मिळाले आहे.राहुरी तालुका गणित विज्ञान संघटनेचे ते कार्यअध्यक्ष असून अनेक शाळेत जाऊन अंधश्रद्धा निमूलनाचे सप्रयोग ,हसत खेळत विज्ञान , विज्ञान कार्यशाळा घेणे असे अनेक ते उपक्रम ते राबवत आहेत.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सचिव डॉ. महानंद माने, सहसचिव डॉ.उल्हास सुर्वे ,खजिनदार महेश घाडगे , राजेंद्र राठोड , प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका योगिता आठरे ,उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे ,पर्यवेक्षक मनोज बावा, प्रा. जितेंद्र मेटकर ,सुरेखा आढाव,घनश्याम सानप, यांनी अभिनंदन केले.

# राहुरी पंचायत समितीची प्रभाग रचना निश्चित




**राहुरी : हॅलो प्रभात**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राहुरी तालुक्यातील प्रभाग रचना निश्चित करण्यात आली असून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यापूर्वी प्रारुप प्रभाग रचना जाहीर केली होती त्यास आलेल्या हरकतीचा विचार करून नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम यांनी अंतिम मान्यता दिली. ह्या रचनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही .अंतिम रचनेनुसार राहुरी तालुक्यात पाच जिल्हा परिषद गट आणि दहा पंचायत समिती गणाचा समावेश आहे टाकळीमिया गटात टाकळीमिया गण व कोल्हार खुर्द गण ब्राह्मणी गटात मानोरी गण व ब्राह्मणी गण गुहा गटात सात्रळ गण व गुहा गण बारागाव नांदूर गटात डिग्रस गण व बारागाव नांदुर गण तसेच वांबोरी गटात उंबरे व वांबोरी गण यांचा समावेश आहेदि १४ जुलै रोजी प्रारुप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली होती मात्र त्यावर नागरिकांकडून आलेल्या हरकती व सूचना विचारात घेण्यात आल्या. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक रणधुमाळी लवकरच सुरू होणार असून इच्छुकांनी आतापासूनच व्युहरचना करायला सुरुवात केली आहे राहुरी जिल्हा परिषद गटाची व पंचायत समिती निवडणूक पक्ष चिन्हावर की स्थानिक पातळीवर आघाडी करून होणार याची गाव पातळीवर चर्चा रंगत आहे.

# खेळातून उत्तम आरोग्य लाभते : प्रा.अनुप मुळे

**जत : हॅलो प्रभात**

राजे रामराव महाविद्यालयात स्टुडंट्स इंडक्शन कार्यक्रमांतर्गत खेळाचे उच्च शिक्षणातील महत्त्व तसेच प्लेसमेंट या विषयांवर विशेष मार्गदर्शन व्याख्यान संपन्न झाले. खेळाचे उच्च शिक्षणातील महत्त्व या विषयावर प्रा.अनुप मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी क्रीडा ही केवळ शारीरिक तंदुरुस्तीची साधनं नसून मानसिक स्वास्थ्य, संघभावना, नेतृत्वगुण आणि आयुष्यातील शिस्त घडविणारी महत्वाची प्रक्रिया असल्याचे सांगितले. उच्च शिक्षणामध्ये क्रीडेला समर्पक स्थान देणे आवश्यक असल्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. व्दितीय सत्रामध्ये प्लेसमेंट आणि करिअर संधी या विषयावर प्रा.प्रकाश माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी उद्योगजगताच्या बदलत्या गरजा, कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व, नोकरीसाठी आवश्यक तयारी व मुलाखतीसाठी लागणाऱ्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या पैलूंची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाबरोबर रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शारिरीक शिक्षण संचालक श्रीमंत ठोंबरे होते. प्रास्ताविक डॉ.ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी तर आभार प्रा.धनंजय मुंडे यांनी मानले.

# वारी जि.प.शाळेचा वाढता आलेख कौतुकास्पद : राजेश परजणे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

अलीकडच्या काळात राज्यातील सर्वच जिल्हा परिषद शाळेतील घटणारी पटसंख्या ही समस्या बनली आहे. शासन यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. परंतु; या सर्व बाबीचा विचार करता अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. मात्र; वारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा मागील तीन वर्षाचा पटाचा आलेख वाढता असून इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी देखील या शाळेत प्रवेश घेत आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली मध्ये तब्बल ७० विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले आहेत, ही संख्या तालुक्यातील सर्वाधिक असल्याने ही बाब निश्चितच कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश परजणे यांनी काढले. कोपरगाव तालुक्यातील वारी येथील

### शालेय साहित्य वाटपासह विविध कामांचे लोकार्पण



जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय उपयोगी विविध कामांचे लोकार्पण, उद्घाटन तसेच राहुल मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, शब्दबाग उजळणी पुस्तिका याचे वाटप राजेश परजणे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोपरगाव पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र टेके होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी राजेश परजणे यांच्या हस्ते चिकूच्या झाडाची लागवड करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कोपरगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, सरपंच योगिता जाधव, माजी सरपंच बद्रीनाथ जाधव, माजी सरपंच सतीशराव कानडे, पंचायत समितीचे माजी सदस्य मधुकर टेके, बाजार समितीचे संचालक प्रकाश गोर्डे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, कैलास शेळके उपस्थित होते.

यावेळी सरपंच योगिता जाधव, मधुकर टेके यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणातून मच्छिंद्र टेके यांनी शाळेचा इतिहास सांगत विद्यार्थ्यांच्या होत असलेला विकास आणि भौतिक सुविधा याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, सुधाकर आंबिलवादे, पांडुरंग खाडे, गोविंदा पोरे, गोरक्षनाथ साबळे, भागा जाधव, दत्तात्रय चव्हाण, प्रवीण आहेर, अरुण पवार, शर्मिला विधाते, स्वरा टेके या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित टेके यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय चव्हाण व प्रवीण आहेर यांनी केले तर प्रकाश गोर्डे यांनी आभार मानले.

# कोल्हापूर जिल्हा कोर कमिटी मेंबरपदी प्रकाश देशमुख

**पन्हाळा : हॅलो प्रभात**



आसूर्ले (ता.पन्हाळा) येथील प्रकाश देशमुख यांची भाजपा कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण पूर्व) पदी सलग दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. प्रकाश देशमुख यांनी बूथ प्रमुख, तालूका सचिव, तालुका उपाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत. शाहूवाडी मतदारसंघात पक्षाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचवण्यात ते यशस्वी झालेले आहेत. तसेच पक्षवाढ व संघटना मजबूत करण्यात शाहूवाडी विधानसभा मतदार संघात त्यांचे मोलाचे कार्य आहे. देशमुख यांच्या कामाची दखल घेवून पक्षाने सलग दुसऱ्यांदा जिल्हा उपाध्यक्षपदी तसेच कोल्हापूर जिल्हा कोर कमिटी मेंबर पदी निवड केली आहे. सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांचा पक्षाने योग्य सन्मान केल्याने विधानसभा मतदार संघात कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. निवडीसाठी प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आ. चंद्रकांत पाटील, खा. धनंजय महाडिक, आ.अमल महाडिक, आ. राहूल आवडे, सूरेश हाळवणकर, विजेंद्रसिंह माने, अजय भाऊ चौगुले व तालूका अध्यक्ष अमार अमरसिंह भोसले यांचे सहकार्य लाभले.

# खड्डे युक्त रस्त्यावरील टोल आकारू नयेत



स्वाभिमानी शेतकरी संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार खड्डे युक्त रस्त्यावरील टोल आकारू नयेत.अशा आशयाचे निवेदन सहित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोल्हापूर येथील ऑफिसमध्ये प्रकल्प उपसंचालक गोविंद बेअरवार यांच्याकडे देण्यात आले.ावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजित पोवार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष धनाजी पाटील, स्वाभिमानीचे जिल्हा प्रवक्ते विक्रम पाटील, करवीर तालुकाध्यक्ष बाजीराव देवाळकर, शहरा उपाध्यक्ष राजू पाटील, संपर्कप्रमुख अण्णा मगदूम, हातकणंगले तालुकाध्यक्ष सुधीर मगदूम,सरचिटणीस नितेश कोगनोळे उपस्थित होते.

# भारतीय स्टेट बँकेचा ‘बँक आपल्या दारी’ योजनेचा शुभारंभ

**राहुरी : हॅलो प्रभात**

कनगर ग्रामपंचायत व भारतीय स्टेट बँक देवळाली प्रवरा यांनी आयोजीत केलेल्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना नागरिकांनी बँकेकडून मोबाईल क्रमांकावर आलेला ओ टी पी कुणालाही देऊ नये असे आवाहन भारतीय स्टेट बँकेचे मुख्य महाप्रबंधक श्री अनिरुद्ध चौधरी यांनी केले आहे .कनगर ग्रामपंचायत व भारतीय स्टेट बँक शाखा देवळाली प्रवरा यांचे संयुक्त विद्यमाने कनगर येथे बँक आपल्या दारी या योजने अंतर्गत के वाय सी करणे, नवीन खाते उघडने, २० रुपयात २ लाखाचा अपघात विमा उतरविणे शेती व इतर कर्जाची माहिती देणे, अपघात विमा योजना मंजूर झालेल्या मयताच्या वारसाना विमा रक्कम वितरण करणे यासाठी कॅम्प आयोजीत करण्यात आला होता अध्यक्षस्थानी सरपंच सर्जेराव घाडगे होते.यावेळी बोलताना अनिरुद्ध चौधरी यांनी उपस्थित महिला व पुरुष खातेदारांना मार्गदर्शन करताना भारतीय स्टेट बँक राबवित असलेल्या विविध




उपक्रमांची माहिती दिली तसेच शेतकऱ्यांनी पिक कर्जाचा लाभ घ्यावा. त्याचप्रमाणे विश्वकर्मा योजना ,शासनाच्या विविध महामंडळाच्या योजना याचा तरुणांनी लाभ घ्यावा तसेच महिलांनी आपल्या घरातील बालकाचें बँकेत खाते उघडून नातेवाईकांकडून खाऊ साठी आलेल्या पैशांची बचत करावी. त्याचप्रमाणे महिला बचत गटातील सदस्यांनी पुढाकार घेऊन बँकेच्या मदतीने उद्योग व्यवसाय सुरू करून गावातच रोजगार निर्मिती करावी असे आवाहन केले .यावेळी क्षेत्रीय महाप्रबंक श्री इकबाल हुसेन, कृषी विभागाचे धनाजी भागवत, वित्तीय समावेशन अधिकारी अमोल चावरे, जितेंद्र त्यागी देवळालीचे शाखाधिकारी नीरज सिंग,एसबीआय पेमेन्ट चे फील्ड ऑफिसर मनोज गुंजाळ, सिद्धार्थ जगताप, दत्तात्रय येवले सुहानी साळवे, प्रमिला जगताप शुभांगी मकासरे अमोल जवने, नवनाथ शेलार, सुमित शेलार सह अधिकारी कर्मचारी महिला बचत गटाच्या समन्वयक सुरेखाताई भांड तसेच उपसरपंच बाळासाहेब गाढे, मोहम्मद भाई इनामदार बाबासाहेब गाडे तंटामुक्तीचे अध्यक्ष गोविंदराव दिवे सोसायटीचे चेअरमन अण्णासाहेब शेटे वाय चेअरमन सुभाष नालकर अण्णासाहेब गाढे भाऊसाहेब घाडगे राजेंद्र दिवे जयसिंग घाडगे शंकर जाधव यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५००० /- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७००० /- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १०००० /- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै. हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976